11 JAN 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राऊत यांच्या पुरस्काराने शाहिरी परंपरेचा सन्मान

## डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठाने शिवशाहिरांच्या पाठीवर मारली कौतुकाची थाप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवशाहीर राजू राऊत यांना महाराष्ट्र शासनाकडून शाहिरीसाठीचा सांस्कृतिक पुरस्कार जाहीर होणे ही एका हरहुन्नरी आणि विनम्र कलावंतांचा सन्मान असून समस्त कोल्हापूरकरांसाठी अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

शिवशाहीर पुरुषोत्तम ऊर्फ राजेंद्र कृष्णाजी राऊत यांना शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा शाहिरी क्षेत्रातील योगदानासाठी पुरस्कार नुकताच जाहीर झाला. त्यानिमित्त कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सोमवारी त्यांची त्यांच्या 'शिव-छाया' निवासस्थानी भेट घेतली. शाहू चरित्र ग्रंथ भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले.




शिवशाहीर राजू राऊत यांचे राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांच्या घरी जाऊन ग्रंथभेट देऊन सत्कार केला. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राऊत यांच्या पत्नी सुनीता राऊत उपस्थित होत्या.

डॉ. शिर्के म्हणाले की, राजू राऊत हे केवळ शाहीर नाहीत, तर चित्रकला, शिल्पकला, फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी, दुर्मीळ वारशांचे संग्राहक आणि अभ्यासक अशा कलागुणांनी समृद्ध असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. कोल्हापूरच्या शाहिरी परंपरेचा तर हा सन्मान आहेच; पण त्याचबरोबर हरहुन्नरी, अष्टपैलू कलावंतांची खाण असलेल्या करवीरभूमीचाही गौरव आहे. त्याचा विद्यापीठ परिवारासह समस्त करवीरवासीयांना अभिमान आहे. या पुढेही त्यांच्या हातून अशीच सेवा घडत राहावी.

सुमारे तासभराच्या या भेटीमध्ये शाहीर राऊत यांनी त्यांच्या कलात्मक प्रयोगशीलतेचे काही भारावून टाकणारे नमुने सादर केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राऊत परिवारातील सदस्यही उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
पुण्यनगरी




# शिवशाहीर राऊत यांचे अभिनंदन

कोल्हापूर : शिवशाहीर राजू राऊत यांना महाराष्ट्र शासनाकडून शाहिरीसाठीचा सांस्कृतिक पुरस्कार जाहीर होणे ही एका हरहुन्नरी आणि विनम्र कलावंताचा सन्मान असून समस्त कोल्हापूरकरांसाठी अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले. येथील सुप्रसिद्ध शिवशाहीर पुरूषोत्तम ऊर्फ राजेंद्र कृष्णाजी राऊत यांना महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा शाहिरी क्षेत्रातील योगदानासाठी पुरस्कार नुकताच जाहीर झाला. त्या निमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांची त्यांच्या 'शिव-छाया' निवासस्थानी भेट घेतली. शिवाजी विद्यापीठ परिवारातर्फे शाहू चरित्र ग्रंथ भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राऊत परिवारातील सदस्यही उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
पुण्यनगरी

# लोकपालपदी न्या. कुलकर्णी यांची नियुक्ती




कोल्हापूर : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (सेवानिवृत्त) सुधीर पुरूषोत्तम कुलकर्णी यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली. विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), नवी दिल्ली यांच्या दि. ११ एप्रिल २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कुलगुरू यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या निकालाबाबत अपिलीय अधिकारी व लोकपाल म्हणून निवृत्त न्या. सुधीर पुरूषोत्तम कुलकर्णी यांची नुकतीच नियुक्ती केलेली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
महासत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या लोकपालपदी न्या.सुधीर कुलकर्णी यांची नियुक्ती

कोल्हापूर,ता.९ (प्रतिनिधी)-

जिल्हा व सत्र न्यायाधीश (सेवानिवृत्त) सुधीर पुरूषोत्तम कुलकर्णी यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.



विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), नवी दिल्ली यांच्या दि. ११ एप्रिल २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कुलगुरू यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या निकालाबाबत अपिलीय अधिकारी व लोकपाल म्हणून निवृत्त न्या.सुधीर पुरूषोत्तम कुलकर्णी यांची नुकतीच नियुक्ती केलेली आहे. या नियुक्तीस त्यांनी स्वीकृती दर्शविली आहे. न्या. कुलकर्णी नांदेड येथून मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरून ते सप्टेंबर २०१८ मध्ये निवृत्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
सकाळ

# पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी अभ्यासात सातत्य महत्त्वाचे

## डॉ. पवार; विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १० : 'पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासाचे सातत्य असणे महत्त्वाचे आहे. आवश्यक विषय व संशोधन पद्धती यांचा साकल्याने अभ्यास केला पाहिजे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे आयोजित 'पीएच. डी. प्रवेश परीक्षा तयारी' या विषयावरील ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डी. के. मोरे होते. 'प्रथम व द्वितीय वर्षाचा आवश्यक विषयाचा अभ्यास करताना त्याच्यासाठी कोणती संशोधन पद्धती वापरलेली आहे. याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. त्यासाठी क्रमिक पुस्तकांचा अभ्यास करून त्यातील आशय समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी वापरली गेलेली संशोधन पद्धती अभ्यासली पाहिजे. संशोधन पद्धतीचा अभ्यास करताना मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेची पुस्तके वाचणे आवश्यक असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले. 'पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी संशोधन करण्याची तयारी ठेवावी', असे डॉ. मोरे यांनी सांगितले. यावेळी उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रकाश बेळीकट्टी करून दिली. डॉ. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
सकाळ

# शिंदे सरकार महाविद्यालयात पारितोषिक वितरण

कोल्हापूर, ता. १० : डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात झाला. शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा माधुरी शिंदे, प्राचार्य डॉ. बी. डी. गिरीगोसावी, डॉ. एन. एन. शिंदे, प्राचार्य शिवाजीराव देशमुख, डॉ. विलास पोवार, अतुल बोंद्रे, प्रथमेश शिंदे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. गिरीगोसावी यांनी कामकाजाचा आढावा घेतला. डॉ. आर. जी. कोरबू यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. ए. बी. पाटील यांनी अहवालवाचन केले. अभिमन्यू पाटील, तनिषा नलवडे यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. श्रावणी पाटील, भार्गव उरुणकर, समृद्धी यादव, अफिफा मणेर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. वाय. माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
पुण्यनगरी

# ऑनलाईन एमबीए प्रवेशासाठी पूर्व नावनोंदणी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबर ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहेत. त्यामध्ये ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम लवकरच सुरु करण्यात येत असल्याची माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम सुरु करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकाल ही सर्व ऑनलाईन पध्दतीने असणार आहे. ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाची पदवी इतर कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे. प्रवेश प्रक्रीया सुरु होण्यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने पूर्व नाव नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
11 JAN 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एल निनोमुळे स्थलांतरित बदक वाढले


## विद्यापीठातील चित्र : बर्डस् ऑफ कोल्हापूरतर्फे पक्षी निरीक्षण

कोल्हापूर, ता. १० : एल निनोमुळे झालेल्या वातावरण बदलाचा परिणाम म्हणून पक्ष्यांना नेहमीपेक्षा जास्त स्थलांतर करावे लागत आहे. यामुळे काही स्थलांतरित बदकांच्या नोंदी होत आहेत. गेल्या रविवारी शिवाजी विद्यापीठात झालेल्या पक्षीनिरीक्षणात बर्डस् ऑफ कोल्हापूरच्या सदस्यांनी हे निरीक्षण नोंदवले. या पक्षीगणनेमध्ये ८९ प्रजातींच्या ७७४ पक्ष्यांची नोंद झाली. यामधील १६ स्थलांतरित प्रजाती, दोन स्थानिक-स्थलांतरित, ७१ रहिवासी प्रजातींची नोंद केली.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, वाइल्डलाईफ वॉर्डन स्वप्नील पवार, बर्डस ऑफ कोल्हापूरचे प्रणव देसाई, सतपाल गंगलमाले व हिमांशू स्मार्त यांनी पक्षी



उघड्या चोचीचा करकोचा



कॉमन किंगफिशर

गणनेत मार्गदर्शन केले तर अभिषेक शिर्के, पृथ्वीराज सरनोबत, मंदार रुकडीकर, ऋतुजा पाटील व सचिन कांबळे यांनी पक्षी गणनेची कार्यपूर्ती केली.

स्थलांतरित पक्षी : ग्रीन-विंग टील (चक्रांग), नॉर्थन शॉवलर (थापट्या बदक), वूड सांडपायपर (कवड्या तुतारी), कॉमन सांडपायपर (सामान्य तुतारी), ब्राउन श्राइक (तपकीरी खाटीक), एशी ड्रोंगो (राखी कोतवाल), रेड ब्रेस्टेड फ्लायकॅचर (लाल छातीचा माशीमार), टायगा फ्लायकॅचर (लाल कंठाची माशीमार), ब्लिथस रीड वॉब्लर (ब्लिथचा वेळू वटवट्या), साईक्स वॉब्लर (साईक्सचा वटवट्या), बुटेड वॉब्लर (पायमोज वटवट्या), ट्री पीपीट (वृक्ष तिरचिमणी), वेस्टर्न यल्लोव वॅगटेल (पिवळा धोबी), ग्रे वॅगटेल (करडा धोबी), व्हाईट वॅगटेल (पांढरा धोबी) आययुसीएन संकटग्रस्त यादीतील प्रजाती : इंडियन रिव्हर टर्न (नदी सुरय), वुली नेक स्टोर्क (पांढऱ्या मानेचा करकोचा).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2024
पुण्यनगरी

# अक्षता साबळे हिची पथसंचलनासाठी निवड



गडहिंग्लज : ओंकार महाविद्यालयाची विद्यार्थीनी अक्षता साबळे हिची शिवाजी विद्यापीठ संघातून प्रजासत्ताक दिन पथसंचलन २०२४ साठी निवड झाली आहे. पथसंचलन मुंबई दादर शिवाजी पार्क येथे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी होणार आहे. तीला संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, काशिनाथ तनंगे यांचे मार्गदर्शन लाभले.